म. शु. स. से. प्र. ४०८

R—I

(५८)

## अधिसूचना

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ६ एप्रिल, १९९८.

क्रमांक एफटीआर १२९७/प्रक्र ३०२/फ-४ भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि यासंबंधात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र वनसेवा गट-ब मधील वनक्षेत्रपाल या पदावरील सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे खालील नियम करीत आहेत:-

१. या नियमांना "महाराष्ट्र वन सेवा, गट ब मधील वनक्षेत्रपाल [सेवाप्रवेश] नियम, १९९७ असे म्हणता येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात -

[अ] "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

[ब] "वनक्षेत्रपाल प्रशिक्षण पाठ्यक्रम" म्हणजे, भारत सरकारने किंवा राज्य शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार वनक्षेत्रपालांना वनशास्त्र व संलग्न विषयासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी, वनक्षेत्रपाल प्रशिक्षण महाविद्यालयाद्वारे चालविण्यात येणारा प्रशिक्षण पाठ्यक्रम.

[क] "विभाग", म्हणजे महाराष्ट्र शासनाचा महसूल व वन विभाग.

३. महाराष्ट्र वन सेवा, गट ब मधील वनक्षेत्रपाल या पदावरील नेमणुका एकतर :-

[अ] ज्यानी वनपाल हे पद धारण केले आहे आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण या किमान शैक्षणिक पात्रतेसह वनपाल म्हणून तीन वर्षाहून कमी नाही अशी नियमित सेवा झालेली आहे अशा व्यक्तीमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पात्रतेच्या अधीन योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल किंवा,

[ब] वनक्षेत्रपाल प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी, यासंबंधात वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार आयोगाने घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे, त्यांची निवड झाली आहे आणि ज्यांनी हा प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला आहे अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,

४. स्पर्धात्मक परीक्षेत बसण्यास पात्र ठरण्यासाठी उमेदवार,

[अ] अठरा वर्षापेक्षा कमी आणि तीस वर्षाहून जास्त वयाचा नसावा,

[ब] वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र गणित, भौतिक शास्त्र, सांख्यिकी, प्राणीशास्त्र, उद्यानविद्या, कृषिशास्त्र, अभियांत्रिकी या विषयापैकी किमान एका विषयातील सांविधिक विद्यापीठाचा पदवीधारक असावा.

| उमेदवाराचा प्रवर्ग | उंची [सें.मी.] | छातीचा घेर [सें.मी] [न फुगविता] | कमीत कमी फुगवून [सें.मी.] |
|---|---|---|---|
| पुरुष उमेदवार | १६३ | ७९ | ५ |
| स्त्री उमेदवार | १५० | ७४ | ५ |
| [अनुसूचित जमातींमधील उमेदवारांच्या बाबतीत खालीलप्रमाणे] | | | |
| पुरुष उमेदवार | १५२.५ | ७९ | ५ |
| स्त्री उमेदवार | १४५ | ७४ | ५ |

[क] सुधारणेनंतर [आफ्टर करेक्शन] ४ + ० सह प्रत्येक डोळ्याची दृष्टीतीक्ष्णता [व्हीज्युअल ॲक्युइटी] ६/६ असावी. बाह्य डोळ्यावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

[ड] पुरुष व महिला उमेदवारांमध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक असेल.

परंतु स्पर्धात्मक परीक्षेद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना नियम ४[क], ४[ड] व ४[ई] मधील तरतुदीच्या अधिन राहून विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या शारिरीक व वैद्यकिय चाचण्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुका ५०:५० या गुणोत्तरात करण्यात येईल.

६. नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तीचा, परिविक्षाधीन कालावधी तीन वर्षाचा असेल, ज्यामध्ये भारत

...३

सरकारने यासंबंधात मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविद्यालयातील दोन वर्षांचे प्रशिक्षण व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर किंवा मुख्य वनसंरक्षक [प्रशासन] यांनी ठरविल्याप्रमाणे एक वर्षाचा क्षेत्रिय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

७. नामनिर्देशनाने नेमणूक केलेल्या वनक्षेत्रपालाच्या नियुक्तीची परस्पर वरिष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळविलेले गुण व प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या शेवटी घेण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेत उमेदवाराने मिळविलेले गुण एकत्रित करून निर्धारित केली जाईल.

८. या पदावरील पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नेमणूक केलेल्या व्यक्तीने, आधीच परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल तर तिला नियमानुसार विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठीमधील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

९. या पदावरील नेमणूक करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[गोविंद स्वरूप]
सचिव [वने].

......

क्रमांक एफटीआर १२९०/प्र.क्र. ३०२/फ-४
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: एप्रिल १९९८.

प्रत माहितीसाठी सस्नेह सादर,

१] मा. राज्यपाल यांचे सचिव,

२] मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३] मा. मंत्री [वने] यांचे खाजगी सचिव.

४] मा. राज्यमंत्री [वने] यांचे खाजगी सचिव